# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## प्रस्तावना:

स्वतंत्र भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. विकेंद्रीकरण ही लोकशाहीच्या दृष्टीने एक अत्यावश्यक बाब आहे. विकेंद्रीकरणांतर्गत सत्तेची विभागणी केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यात करण्यात आली. या विकेंद्रीकरणांतर्गत घटकराज्य पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थाची निर्मिती करण्यात आली. ग्रामीण विभागासाठी पंचायत राज संस्था आणि शहरासाठी नगरपालिका व महानगरपालिका अशी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली. महाराष्ट्रात १९९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठीचे ३० टक्के राखीव जागेचे धोरण अंमलात आले. त्यानंतर ७३ आणि ७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा बहाल करण्यात आला व या धोरणाची अंमलबजावणी राष्ट्रीय पातळीवर करण्यात आली व ३० टक्के ऐवजी ३३ टक्के आरक्षण लागू करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्याने महिलांना सामाजिक व राजकीय सहभागाची संधी प्राप्त झाली. यामुळेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांच्या सहभागामध्ये बदल झाल्याचे जाणवते. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांनी काही क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केल्याचे आपणास दिसून येते. आज निवडून आलेल्या महिला अधिक कार्यक्षमपणे आणि आत्मविश्वासाने काम करताना आढळतात. नळपाणी योजना असो, पाण्याचा प्रश्न, अस्वच्छता, कुपोषण इत्यादी समस्यांचा त्रास पुरूषांच्या तुलनेने महिलांनाच जास्त भोगावा लागतो. त्यामुळे हे प्रश्न सोडविण्यात महिलांचे योगदान प्रभावी दिसून येते आहे. म्हणूनच नगरपरिषदेतील महिला सदस्यांच्या कार्याचा त्यांच्या योगदानाचा अभ्यास करण्यासाठी ''इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय योगदान आणि प्रभाव'' (२००१ ते २०१०) हा विषय निवडला आहे. (२००१ ते २०१०) या कालावधीत नगरपरिषदेवर निवडून आलेल्या महिला सदस्यांचा कार्याचा अभ्यास केला जाणार आहे.

## भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास

भारतीय नागरी प्रशासनाचा इतिहास आपणास सिंधु संस्कृतीमध्ये आढळून येतो. सिंधू संस्कृतीमध्ये नगर नियोजन पध्दतीने शहराची रचना पाण्याची रचना, रस्ते इत्यादी वैज्ञानिक दृष्टिकोनातून केलेले दिसतात. या संस्कृतीमध्ये नगर रचना ही अत्यंत उत्तम होती. सिंधू संस्कृतीनंतर ऋग्वैदिक व उत्तर वैदिक काळ या काळामध्ये नागरी संस्कृतीपेक्षा ग्रामिण संस्कृती अत्यंत प्रगत होती. पुढे रामायण महाभारतामध्ये अयोध्या, व्दारका, हस्तिनापुर यासारख्या समृध्द् नगरांचा उल्लेख आढळतो. महाभारताच्या शांतीपर्वामध्ये नागरी व्यवस्थेमध्ये उल्लेख आढळतो. बौध्द काळात निर्माण झालेले अनेक महाजनपदे ही प्रमुख नगरेच होती यामध्ये पाटलीपुत्र, कोसल, वैशाली, वाराणसी ही नगरे असल्याचे दिसते.

मौर्य प्रशासन व्यवस्थेत नागरी शासन व्यवस्था अत्यंत सुव्यवस्थीत होती ज्यात नगराचा प्रधान हा नागरीक होता. नगर प्रशासनात ३० सदस्यीय मंडळ अनून त्यामार्फत नगराचा कारभार पाहला जात असे. गुप्त सम्राज्यामध्ये नगराच्या प्रधान अधिका—याला पूरपार असे म्हटले जात असे तसेच नगराची एक महाराज सभा असे. सल्तनत व्यवस्थेमध्ये नागरी प्रशासनाच्या अधिका—याला, अमिर—ए—सदा हे नाव असून नगराच्या देखभालीसाठी दिवाण—ए—वियासत नावाचे मंत्रालय होते. मुघलकाळामध्ये नगर प्रशासनाची जबाबदारी ही कोतवाल नावाच्या अधिका—याकडे होती.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर नगर प्रशासन संबंध १६८७ मध्ये मद्रास या शहरासाठी व त्यानंतर १७९३ च्या चार्टर ॲक्टनुसार कलकत्ता व मुंबई या शहरासाठी नगर निगम संस्था निर्माण केली. १८८२ मध्ये लॉर्ड रिपनने नगर परिषदेचा विकास करण्यावर अधिक भर दिला.व याला १९०८ च्या रॉयल कमिशनरच्या अहवालाने व्यापक स्वरूप प्राप्त केले. याच्या माध्यमातून विकेंद्रीकरणावर अधिक भर दिला. ब्रिटिश कारकिर्दीमध्ये १९१९व १९३५ च्या कायदयाने स्थानिक शासनाच्या कारभारावर अधिक लक्ष दिले.

## राज्यघटना व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

भारतामध्ये अगदी प्राचिन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या स्थानिक स्वराज्य संस्थेत नागरी स्वराज्य संस्थेतचे स्वरूप प्रामुख्याने ब्रिटिश काळात विकसीत झाले. यामध्ये सर्वप्रथम १७९३ चा चार्टर ॲक्ट या चार्टर ॲक्टनुसार शहर नगर परिषद अस्तित्वात आली. महाराष्ट्रामध्ये नागरी प्रशासनाची सुरूवात १७२६ ला झाली असून १८०३ पासून मुंबई शहरासाठी नागरी कायदे करण्याची सुरूवात झाली. मुंबई जिल्हा पालिका कायदा १९०१ ला झाला आणि त्यानूसार नगर परिषदेच्या रचनेला व कार्याला स्वातंत्र मिळाले. १९४९ ला बॉम्बे प्रोव्हिजनल मुनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट झाला. ज्या ॲक्टने पुणे, नागपूर, कोल्हापूर या महानगरपालिका अस्तित्वात आल्या. महाराष्ट्रात सध्या २३ महानगरपालिका या ॲक्टने स्थापन झाल्या. महाराष्ट्रामध्ये १९६५ साली कायदा करून नगर परिषद यांच्यात सुसुत्रता आणली गेली. महाराष्ट्रात १९६५ नंतर नगर परिषदेचे जुने कायदे बदलून नविन कायदे अस्तित्वात आले.

नागरी स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा १९९३ पूर्वी नव्हता पण २० एप्रिल, १९९३ रोजी ७४ वी घटनात्मक दुरूस्ती होऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा दिला गेला. या घटनात्मक दर्जेमुळे नागरी स्वराज्य संस्थेला राज्यघटनेत कलम २४३ मध्ये सामावून घेतले व घटनेत १२ वे परिशिष्ट जोडले गेले. यात १८ विषय निश्चित केले गेले. या घटनादुरूस्तीनुसार महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले गेले.

नागरी स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला व महिलांना राजकीय आरक्षण प्राप्त झाले. महिलांना स्थानिक निवडणूकीमध्ये राजकीय पक्षांमार्फत सहभाग वाढवला जाऊ लागला ज्यातून महिलांचे राजकीय नेतृत्व उभे राहू लागले.

**महिला आरक्षण :**

भारतीय जातीव्यवस्थेत स्त्रीयांना दुय्यम स्वरूपाचे स्थान दिले गेले आहे. तसेच हिंदू धर्मा नेहि स्त्रीयांनवर बंधने लादली आहेत या बंधनामुळे स्त्रियांवर अनेक वर्ष अन्याय झाला आहे तसेच त्याचे

शोषण केले गेले. स्त्री ही एक उपभोग वस्तू मानली गेली. पूर्वीच्या काळात स्त्रीयांच्या विकासाला स्थी होती परंतु टोळी संस्कृतीत पुरूषसत्ताचा विकास झाला व मातृसत्ता लयास जावून पीतृसत्ता सामाज निर्माण झाली . त्यातूनच जी समाजरचना निर्माण झाली त्या समाजरचनेत स्त्रीला अनेक नातेसंबधात बांधले गेले. तीच्या शरीरसंबधावर नियंत्रण घातले गेले.पुढील काळात पवित्र आणि अपवित्र या संकल्पनेतून स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली . याचा परिणाम मध्ययुगीन कालखंडात कुळाचे श्रेष्ठत्व व पवित्रपणा या संकल्पनेतून अनेक रूढी व प्रथा निर्माण झाल्या त्यात बालविवाह, सतीप्रथा, केशवपन यासारखी बंधने हिंदू स्त्रीयांमध्ये होती तशीच ती मुस्लीम स्त्रीयांमध्ये होती. ब्रिटीश कालखंडात स्त्रीयांच्या विषय सुधारणा होवू लागल्या पण त्या उच्च वर्गापूरतेच मर्यादीत होते. राजराम मोहन रॉय, गो.गो.आगरकर अशा समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या सुधारणेकडे लक्ष दिले. यांना या सुधारणा करताना सनातनी लोकांचा मोठ्या प्रमाणत रोष सहन करावा लागला.या पुढे जाऊन स्त्री सुधारणेबाबत व समाजाच्या रूढीवर पहार करण्याचे कार्य विठ्ठल रामजी शिंदे, ज्योतीबा फुले ,डॉ.आंबेडकर ताराबाई शिंदे या सारख्या सुधारणावादीने प्रखरतेने विचार मांडून समाजात पुरूषसत्ता, जाती व्यवस्था, वर्णव्यवस्था याविरूध्द बंड निर्माण करून स्त्री सुधारणेची चळवळ व्यापक बनवली.

स्त्री विषय सुधारणावदी चळवळीचा प्रभाव स्त्रीयांच्या राजकीय सहभागात काही प्रमाणात झाला. १८८५ च्या राष्ट्रीय अधीवेशनात ८ ते १० स्त्रीयांचा सहभाग त्याच पध्दतीने स्त्रीयांच्या संघटना स्थापन झाल्या.यातून स्त्रीयांना मताधिकाराची मागणी पुढे आली व यासाठी मोठया पमाणात प्रयत्नही सुरू झाले.याचाच परिपाक म्हणजे मद्रास प्रांताने स्त्रीयांना सर्वप्रथम मतदानाचा अधिकार दिला. १९२७ नंतर अनेक प्रांतीय सरकारने स्त्रीयांना मताधिकार बहाल केला तसेच स्त्रीयांना १९२७ मध्ये कायदेमंडळाची निवडणूक लढवण्याचा अधिकार बहाल करावा अशी मागणी आली पण ती लोकमता अभावी पूर्ण झाली नाही म्हणून प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणूकीमध्ये स्त्रीयांचा सहभाग घेतला पण येथे स्त्रीया पराभूत झाल्या. यामुळे स्त्रीयांना अखिल महिला परिषदेने विधीमंडळात स्त्रियांची नियुक्त करावी अशी मागणी केली गेली व याला यश आले सर्वप्रथम मद्रास प्रातांमध्ये येथील प्रांतीय सरकारने स्त्रीयांना विधीमंडळात नियुक्तीस संमती दिली. पुढे १९३७ च्या प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणूकीमध्ये ५४ महिला या निवडून आल्या.या आधी स्त्रीयांचा राजकीय सहभाग प्रमुख्याने महात्मा गांधीनी आपल्या चळवळीच्या माध्यमातून वाढवला व स्त्रीशक्तीचा मोठया प्रमाणात सहभाग करून घेतला. यामुळे घरातील स्त्री आंदोलनात माठया प्रमाणात

सहभागी झाल्या. याचा परिणाम म्हणजे स्त्रीयांमध्ये राजकीय जागृती वाढून त्या संघटीत झाल्या व आपल्या हक्कासाठी त्या झगडू लागल्या.

स्वांतत्र्यानंतर भारतीय राज्यघटनाकरांनी घटनेत स्त्री व पुरूष समतेचा पुरस्कार केला. यासाठी राज्यघटनेतील कलमामध्ये तरतूदी केली गेली. अशी राज्यघटनेत तरतूद असूनही राज्यघटनेनुसार केलेल्या कायदयांच्या अमंलबजावणीत पुरूषसत्तेचे वर्चस्व दिसून येते. व्यवस्थेने व्यक्तीगत कायदयातील सुधारणा या धर्मातील हस्तक्षेप अशी आरोड सुरू केली. यामुळेच हिंदू कोड बीलाला मान्यता मिळाली नाही. स्वतंत्र भारतात घटनेनुसार स्त्रियांना सामाजिक दर्जा प्राप्त करून दिला असलातरी स्त्रीवर कौटुबिंक जबाबदारी अधिक वाढवली. ती स्वताः अर्थाजन करत असलीतरी तीला कुटुंबात दुय्यम स्थान मिळत होते. तसेच स्त्रियांवरील अत्याचारात वाढ होवू लागली

स्त्री सशक्त होण्याऐवजी अशक्त बनू लागले आणि तीला मिळणारी वागणूक फक्त दिखावू होती. तसेच व्यवस्थेवर पुरूष सत्ता आपले वर्चस्व निर्माण कण्याचे प्रयत्न करत होते. या दरम्यानच स्त्रियांचा राजकीय सहभाग वेगवेगळया आंदोलनाच्या माध्यमातून सक्रीय होवू लागल्या. यात विस्थापित, आदिवासी, पर्यावरण या सारख्या वेगवेगळया विषयावरील आदोलनात स्त्रीयांचा विशेष सहभाग असलेला दिसतो. यातूनच पुढे स्त्रियांच्या स्थीती विषयक अभ्यास झाले व स्त्रीयांच्या विकास हा प्राधान्याने व्यवस्थेमध्ये विचारात घेतला जाऊ लागला. याचा परिणाम म्हणजे सहाव्या योजनेत स्त्रीयांच्या सहभाग यावर जास्त भर देण्यात आला त्या दृष्टिने नियोजन करण्यात आले. यातूनच स्त्रीयांच्या सबलीकरणाची संकल्पना पुढे आली. या सर्व पार्श्वभूमिवर भारतात राष्ट्रीय महिला आयोग स्थापन झाले आणि या आयोगाने स्त्रीयांना घटनात्मक हक्क मिळवून देण्यासाठी शासनावर दबाव वाढवला. स्त्रीयांना मतदानाचा हक्क दिला आसला तरी त्यांचा राजकारणातील सहभाग नगन्य होता व पुरूषांच्या तुलनने भारतीय राजकारणात स्त्रीयांचा सहभाग अतीशय कमी प्रमाणात होता. यातून स्त्रीयांचा राखीव जागांचा विचार पुढे आला. स्त्रीयांसाठी राखीव जागा असाव्य ही काही नवीन मागणी नव्हती. या संदर्भात गोलमेज परिषदेत स्त्रीयांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली गेली होती. १९३७ प्रांतीय निवडणूकीत स्त्रीयांना विभक्त मतदार संघ होते. स्वातंत्र्यानंतर बलवंतराय समितीने पंचायत व्यवस्थेमधील ग्रमपंचायतीत दोन स्त्रीयांची नेमणूक करावी अशी शिफारस केली. महाराष्ट्रात १९६१ ला ही शिफारस लागू झाली पण अमंलबजावणी झाली नाही. पुढे पंचायत राज विकेंद्रीकरण करण्यासाठी व लोकांचा सहभाग अधिक वाढाण्याच्या दृष्टीने संसदेत ६४ वी घटनादुरूस्ती

मांडण्यात आली. यादुरूस्तीच्या माध्यमातून पंचायत संस्था व नागरी संस्थामध्ये अनुसुचित जाती व जमार्तींना आणि स्त्रीयांना ३० टक्के आरक्षणाची तरतूद केली गेली होती. पण हे घटनादुरूस्ती विधायक संमत झाले नाही. पुढे २२ डिसेंबर १९९२ ला हे विधायक पून्हा संसदेत मांडले गेले व २४ एप्रलि १९९३ राष्ट्रपतीच्या सहीने ७३वी व ७४ घटनादुरूस्ती होवून हे विधायक अस्तीत्वात आले. या घटनादरूस्ती विधायकामुळे त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेत व नागरी व्यवस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षणाची तरतूद लागू झाली तसेच स्त्रीयंसाठी ३३ टक्के अधिकारपदे राखीव झाली आणि या आरक्षणाचे सकारात्मक परिणाम दिसून येवू लागले. महाराष्ट्र शासनाने महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतमध्ये स्त्रियांना ५० टक्के राखीव जागांची तरतूद असलेले विधेयक १३ एप्रील २०११ ला मंजूर केली. या प्रकारे स्त्रीयांचा सहभाग राजकारणात पुरूषां प्रमाणे करून घेतला. यातून स्त्री नेतृत्वाचा विकास होईल आणि स्त्रीयांचा राजकारणात सक्रीय सहभाग वाढेल.

## भारतातील नागरी प्रशासन व महिलांचा राजकीय सहभाग

भारतीय प्रशासकीय व्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग हा प्राचीन काळापासून गौण स्थान दिले असून स्वतंत्र चळवळीत महिलांचा सहभाग राजकीय आंदोलनात करून घेण्यास सुरवात झाली. सर्वप्रथम महात्मा गांधीनी महिलांचे महत्व समाज विकासासाठी महत्वाचे असून राजकीय चळवळीमध्ये महिलांच्या सहभागावर त्यांचा भर होता. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटना अंमलात आल्यानंतर स्त्री व पुरूषांना समान राजकीय हक्क प्राप्त झाला. असे राजकीय हक्क महिलांना प्राप्त झाले असले तरी पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये राजकारणामध्ये फक्त पुरूषांचीच मक्तेदारी असते असे मानले जाते. महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी भारतामध्ये केंद्रिय पातळीपेक्षा स्थानिक पातळीवर प्रयत्न केले गेले. यामध्ये महिलांना स्थानिक संस्थेत ३३ टक्के आरक्षण देऊन त्यांचा स्थानिक राजकारणात सहभाग वाढवला. स्थानिक स्वराज्य संस्थेतील ७४व्या घटनादुरूस्तीनुसार महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण दिले. त्याच्या माध्यमातुन निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढवण्यास प्रयत्न केले गेले.

**इचलकरंजी नगरपरिषद:**

इचलकरंजी शहराचा मूळ उगम कापशी संस्थानातून झाला. नारोपत जोशी ऊर्फ घोरपडे हे या शहराचे मूळ संस्थापक होते. इचलकरंजीचे जाहगिरदार कै. श्रीमंत नारायणराव घोरपडे यांनी ७००० लोकसंख्या असताना सन १८९३ साली नगरपरिषद स्थापन केली. महाराष्ट्रातील नगरपालिकेचे कार्य महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार सीमित करण्यात आले आहे. इचलकरंजी शहराचे भौगोलिक स्थान समुद्र सपाटीपासून ५५६ मीटर उंचीवर असून नगरपरिषद हद्द क्षेत्र २९.८४ चौ. किमी. एवढे आहे. २००१ च्या जनगणनेनूसार शहराची लोकसंख्या २५७६१० इतकी होती. शहरातील लोकांचा मुख्य व्यवसाय यंत्रमागावर कापड तयार करणे हा आहे. संपूर्ण शहरभर विस्कळीत स्वरूपात घरोघरी यंत्रमाग असल्याने संपूर्ण शहरच औद्योगिक शहर म्हणून प्रसिध्द असून त्यास महाराष्ट्राचे मँचेस्टर समजले जाते व कामगार वर्ग या नगरीचे आभुषण आहे.

इचलकरंजी नगरपरिषद ही कोल्हापूर जिल्हयांतील एकमेव 'अ' वर्ग नगरपरिषद आहे. महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत नगरपरिषद म्हणून या नगरपरिषदेचा उल्लेख केला जातो. २००१ मध्ये पहिल्यांदाच नगरपालिकेचे नगराध्यक्षपदाचे आरक्षण बदलले आणि राजकीय घराण्याचा वारसा लाभलेल्या सौ. किशोरी आवाडे यांची महिला नगराध्यक्षा म्हणून निवड झाली. त्यांनी साडेसात वर्षे नगराध्यक्ष पद भूषविले आहे. त्यानंतर २००९ साली ते आतापर्यंत सौ. मेघा चाळके हया नगराध्यक्षपदी विराजमान आहेत. महिला व बालकल्याण समिती तसेच वेगवेगळया विषय समित्यांमध्ये महिलांनी अध्यक्षपद भूषविलेले दिसून येते. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रियांचा सहभाग हा अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. या महिला नगरसेविकांनी आपल्या सभागृहातील कामकाजाव्यतिरिक्त आपापल्या प्रभागातील महिलांच्या विविध समस्या सोडविण्यासही प्राधान्य दिलेले दिसते. त्याचा फायदा त्या नगरसेविकांना त्यांच्या राजकीय कारकिर्दीस झाला आहे. याशिवाय श्रीमती किशोरी आवाडे यांच्या पुढाकाराने शहरात 'क्रांती महिला प्रशिक्षण' प्रकल्प सुरू झाला आहे. त्यामुळे शहरातील महिलांना वस्त्रोद्योग क्षेत्रातील नवनविन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. शिवाय गारमेंट व्यवसायाबाबतही तंत्रशुध्द प्रशिक्षण दिले जात आहे. महिलांना आत्मनिर्भर व

सक्षम करण्यासाठी तेथील स्थानिक महिला नेतृत्वाच्या माध्यमातून हे महत्वाचे पाऊल ठरले आहे. त्यामुळे ख—या अर्थाने इचलकरंजी नगरपालिकेतील महिला सदस्यांचे योगदान कितपत आहे. याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. या व्यतिरिक्त नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून या शहरातील महिला व युवतींच्याकरिता फॅशन डिझाईनिंग, कॅटरिंग, कुकिंग, ब्युटीपार्लर, इत्यादी विविध व्यवसायाभिमूख प्रशिक्षण देण्यात आले आहे. महिलांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा. नी सक्षम व्हावी यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व सर्व महिला सदस्या यांचे सहकार्याने या शहरात प्रथमच २००५ मध्ये महिला महोत्सावचे आयोजन केले होते. यामध्ये इचलकरंजी शहरातील महिला बचत गट महिला मंडळे, उद्योजक महिला यांचा समावेश करून घेण्यात आला. या विविध प्रयत्नांमध्ये इचलकरंजी नगरपालिकेतील महिला सदस्यांचे योगदान आणि त्यातून तेथील महिलांचे झालेले सक्षमीकरण याबाबतचा अभ्यास करण्याची गरज आहे. त्यामुळे इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगराध्यक्षा व सदस्या यांच्या कार्याचा, योगदानाचा व प्रभावाचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

**विषयाचे महत्व:**

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा पाया मजबूत करण्या—या असून या संस्थेमध्ये अनेक सुधारणा होवून या संस्थेतून पुढे नागरी स्वराज्य संस्था उदयास आल्या. २० व्या शतकात औद्योगिक क्रांती होऊन नागरीकरण मोठया प्रमाणात वाढू लागले. नागरिकरण्याच्या समस्या वाढत चालल्यामुळे नागरी स्वराज्य विकेंद्रीकरणाची गरज वाढू लागली यातून पुढे नागरी प्रशासनामध्ये राजकीय निर्णयाची आवश्यकता निर्माण झाली. या निर्णयात पुरूषांबरोबर महिलांचाही सहभाग आवश्यक असून ७४ व्या घटनादुरूस्तीनंतर महिलांच्या राजकीय सहभागात ३३ टक्के आरक्षणामध्ये गती मिळाली. या आरक्षणामुळे महिलांचे नागरी स्वराज्य संस्थेमध्ये योगदान व प्रभाव वाढलेला आहे. या पार्श्वभूमीवर इचलकरंजी नगरपरिषद ही एक नागरी स्वराज्य संस्था अभ्यास करण्याच्या दृष्टिने संशोधनासाठी निवड करून इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय योगदान आणि प्रभाव — (२००१ ते २०१०) हा संशोधनासाठी विषय निवडलेला आहे. सन (२००१ ते २०१०) या कालावधीमध्ये इचलकरंजी

नगरपरिषदेच्या राजकारणामध्ये महिलांचा सहभाग काही प्रमाणात वाढलेला आहे. त्यांच्या सहभागामुळे येथील स्थानिक राजकारण बदलले आहे. त्याचबरोबर नगरपरिषदेच्या कामकाजामध्ये स्त्रियांचे योगदान प्रभावी ठरत असल्याने स्त्रियांची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. (२००१ ते २०१०)या कालावधीत सलग १० वर्षे नगराध्यक्ष पदावर महिला कार्यरत असल्यामुळे स्त्री सहभागावर परिणाम झाला का ते तपासणे महत्वाचे वाटते. त्यामुळे सदर संशोधनामध्ये महिला सदस्यांनी केलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक कार्ये आणि त्यांच्या राजकीय प्रभावाचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते हे मुद्दे विचारात घेऊन प्रस्तूत संशोधन विषयाची निवड केली आहे.

**अभ्यासाची व्याप्ती:**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय योगदान आणि प्रभाव — (२००१ ते २०१०)** या प्रस्तुत एम. फिल. संशोधनांतर्गत कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी नगरपरिषदेतील (२००१ ते २०१०) या कालावधीतील महिलांच्या कार्याचा व महिला नेतृत्वाचा अभ्यास करणार आहे. सदर लघु शोधप्रबंधाची व्याप्ती इचलकरंजी नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रापूरती मर्यादित आहे.

**पूर्वाभ्यास अवलोकन:**

१. कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्रि—पुरूष सदस्यांचा तौलनिक अभ्यास सविता आप्पासाहेब पाटील यांनी शिवाजी विद्यापीठास सादर केलेल्या एम. फिल शोधप्रबंधामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री पुरूष सदस्यांचा अभ्यास केलेला आहे. स्त्रियांना महिला आरक्षणामुळे कोणत्या संधी उपलब्ध होतात, स्त्री असण्यामुळे कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते. याचा विविध पैलूंच्या अंगाने संशोधन केलेले आहे.

२. शहरीकरणाच्या समस्या आणि नगरपालिकेचे राजकारण — शोभा बोंगाळे यांनी शिवाजी विद्यापीठास एम. फिल पदवीसाठी सादर केलेल्या अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये महाराष्ट्रातील शहरीकरणाच्या समस्या व राजकारण यचा अभ्यास करताना प्रामुख्याने इचलकरंजी नगरपरिषदेचा विशेष अभ्यास केला आहे. त्याचबरोबर इचलकरंजी नगरपरिषदेची रचना, कार्ये, कामकाज यची

मांडणी करून शहरीकरणाच्या समस्या व त्या अनुशंघाने येथे निर्माण झालेले राजकारण याची मांडणी केली आहे.

३. पॉलिटिकल पार्टीसिपेशन ऑफ वुमेन कार्पोरेटर्स इन सिविल अफेअर्स वुइथ स्पेशल रेफरन्सेस ऑफ कोल्हापूर — वासंती रासम यांनी प्रस्तुत या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये ३० टक्के आरक्षणामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला आहे. स्त्रियांच्या सहभागामुळे भ्रष्टाचारासारख्या घटनांना आळा बसला. उच्च वर्गीय व उच्च वर्णीय स्त्रियांबरोबरच मध्यमवर्गीय व इतर दुर्लक्षित महिलांचा कारभारात सहभाग वाढला पण त्यांच्या सत्तेतील स्थानात बदल झाला नाही याबाबत संशोधन केले आहे.

४. महिलांचा सत्तेतील सहभाग — राखीव जागा धोरणाची फलश्रुती अहवाल १९९७—९८, मेघा नानिवडेकर यांच्या उपरोक्त अहवालांमध्ये ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्यानंतर त्यांची काम करण्याची पध्दत, आरक्षणामुळे त्यांना मिळालेला फायदा आणि त्यांचे अनुभव यांचा अभ्यास केलेला आहे.

५. नगरपालिकेच्या कारभारातील नगरसेविकांचा राजकीय सहभाग —विशेष अभ्यास मुरगुड नगरपालिका —श्री. तुकाराम मारूती पाटील यांनी शिवाजी विद्यापीठास एम. फिल पदवीसाठी सादर केलेल्या अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये मुरगुड नगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या नगरसेविकांच्या कार्याचा अभ्यास केला आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के जागा राखीव मिळाल्याने सहभागी होणा—या स्त्रियांमुळे झालेले बदल नमुद केले आहेत.

६. इचलकरंजी नगरपालिका शताब्दी १०० शुन्यातून शतक —ले. शामराव कुलकर्णी यांनी प्रस्तुत पुस्तिकेमध्ये इचलकरंजी शहराचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. तसेच इचलकरंजी नगरपरिषदेचा अभ्यास करून या शहराच्या औद्योगिक विकासाला कशी चालना मिळाली याचे विवेचन केले आहे.

७. मराठा स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप — रोहिणी गव्हाणकर यांनी या पुस्तकामध्ये महाराष्टधतील मराठी महिलांचा विविध क्षेत्रांमधील असणारा सहभाग तसेच

शहरी आणि ग्रामिण स्वराज्य संस्थेमधील महिलांचा निवडणूकीतील व सामाजिक राजकारणातील सहभाग याविषयी विवेचन केले आहे.

८. पंचायतराज व्दारा अधिकार संपन्नता – सुधा पिल्ले यांनी आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून महिला आरक्षणामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढविला व त्या आर्थिक व राजकीय सक्षम होतील असे मत नोंदविले.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. इचलकरंजी नगरपालिकेच्या सन २००१ ते २०१० या कालावधीर्तील निवडणूर्कींमधील महिला प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करणे.
२. इचलकरंजी नगरपालिकेतील महिला नगराध्यक्षांच्या कार्यकाळात महिलांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेल्या निर्णयांचा व कार्याचा अभ्यास करणे.
३. महिला नगराध्यक्ष व महिला सदस्यांच्या कार्यकालातील कार्याचा आढावा घेणे.
४. इचलकरंजीच्या राजकारणातील महिलांच्या प्रयत्नांमुळे तेथील महिलांच्या झालेल्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१. इचलकरंजी नगरपरिषदेच्या राजकारणामध्ये व कामकाजामध्ये सन २००१ – २०१० या कालावधीत महिलांचा सहभाग वाढत आहे.
२. सन २००१ – २०१० या कालावधीत महिलांचा सहभाग व प्रभाव वाढल्याने येथे महिलांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक सुधारणा झाल्या आहेत.
३. इचलकरंजीत विविध प्रश्न सोडविण्यासाठी महिला सदस्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी क्षेत्रिय संशोधन पध्दती व ग्रंथालयीन पध्दती वापरण्यात आलेली आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांव्दारे माहिती संकलित केली गेली आहे. प्राथमिक स्वरूपाच्या साधनामध्ये २००१ ते २०१० या कालावधीत इचलकरंजी नगरपरिषदेवर निवडून आलेल्या ४३ महिला सदस्यांची निवड केलेली

आहे. तसेच इचलकरंजी नगरपरिषदेचे अहवाल, सर्वसामान्य सभेच्या नोंदी, बैठक वृत्तांत, कार्यालयीन कामकाजाचे कार्यवृत्तांत यांचा अभ्यास केलेला आहे .

दुय्यम स्त्रोतामध्ये या विषयाशी संबंधीत असलेले प्रोजेक्ट रिपोर्टस्, एम. फिल व पीच. डी. प्रबंध तसेच या विषयाशी संबंधित संदर्भ पुस्तके, मासिके व वृत्तपत्रामधील लेख याचा संदर्भ घेतला आहे.

**प्रकरण योजना:—**

प्रस्तुत प्रबंधामध्ये खालील प्रकारे प्रकरणाची योजना केली गेली आहे.

१. **प्रकरण पहिले** :— पहिल्या प्रकरणामध्ये **प्रस्तावना**, विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पध्दती, पूर्व अभ्यास अवलोकन,याचा समावेश केला आहे.

२. **प्रकरण दुसरे :— इचलकरंजी शहराची व नगरपरिषदेची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी** दुसरे प्रकरण हे इचलकरंजी शहराची माहिती तसेच इचलकरंजी नगरपालिकेची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी दिसून येते.

३. **चृकरण तिसरे :— इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग (२००१ ते २०१०)**सदर प्रकरणामध्ये इचलकरंजी नगरपालिकेच्या निवडणूका तसेच त्या निवडणूकीमध्ये असणारा महिलांचा सहभाग

४. **प्रकरण चौथै :— इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग व स्थानिक विकासातील प्रभाव** सदर प्रकरणामध्ये इचलकरंजी नगरपालिका व विकासामधील महिला सदस्यांचे योगदान याचा अभ्यास केला आहे

५. **प्रकरण पाचवे :— सारांश निष्कर्ष व शिफारस**

प्रकरण पाचमध्ये निष्कर्ष, उपाययोजना आणि सांराश लेखन केले गेले आहे

संदर्भ सुची:—

१. आहुजा राम, १९८५, पॉलिटिकल आवरनेस ॲन्ड पॉलीटिकल पार्टिसिपेशन ऑफ वुमन इन रूरल एरियाज, जर्नरल ऑफ सोशालॉजिकल स्टडिज , व्हॅल्युम .

२. टाहुजा राम: पॉलिटिकल आवरनेस ॲन्ड ऑफ सोशालॉजिकल स्टडिज, व्हॅल्युम ४ १९८५पालिटिकल पार्टिसिपेशन ऑफ वुमेन इन रूरल एरियाज, जर्नल

३. महाराष्ट्र राज्य गॅसेटिअर,१९८९कोल्हापूर जिल्हा, शासकीय मुद्रणालय,

४. फडके य. दि. ,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड दूसरा , श्रीविद्या प्रकाशन,पूणे,एप्रील १९९१ .

५. पालमाही: वुमेन इन पंचायत एक्सपीरीएन्सेस ऑफ द ट्रेनिंग कॅम्पू, इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विक्ली, जाने १९९८

६. प्रा. गजेंद्रगड व्ही ,२000,राजकीय समाजशास्त्रीय संशोधन,एन . प्रतिभा प्रकाशन

७. एखेळीकर (डॉ) रमेश,विकास प्रकाशन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०००.

८. सुधा पिल्ले: पंचायत राज व्दारा अधिकार संपन्नता, योजना, ऑगस्ट २००१

९. महाराष्ट्र शासन २00२, मानव विकास अहवाल,महाराष्ट्र शासन, मुबई .

१०. शिरसाठ शाम, बैनाडे भगवान सिंग — भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद — २००६.

११. भारताचे संविधान, भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय , २००६.

१२. वैशाली पवार , पश्चिम महाराष्ट्रातील महानगरपालींचे राजकारण , राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग , पुणे विद्यापीठ पीएच डी चा अप्रकाशीत ग्रंथ,२00७ .

१३. महाराष्ट्र सरकार महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,मुबंई, महाराष्ट्र,२00८ .

१४. गोड सोपान संपा , महाराष्ट्रातील महिलाराज, अविष्कार प्रकाशन,२00८ .

१५. डॉ. बी. एल. फडिया , भारतीय शासन व राजनीति , साहित्य भवन पब्लिकेशन ,२00८

१६. पवार (डॉ) जे. के.,भारत वय वर्षे ६०, राजप्रकाशन कोल्हापूर, २००९

१७. यादव योगेंद्र व सूहास पळशीकर ,लोकशाही जिंदाबाद , समकालीन प्रकाशन पुणे , २0१0

१८. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचनकोल्हापूर जिल्हा, २०११

१९. महाराष्ट्र शासन २0१२, मानव विकास अहवाल,महाराष्ट्र शासन, मुबई .

२०. डॉ.ए.पी.अवस्थी, भारतीय शासन व राजकारण, लक्ष्मी नारायन अग्रवाल, २०१३
२१.डॉ. भारती पाटील, स्त्री, समाज आणि राजकारण, हर्मिस प्रकाशन, २०१४
२२. डॉ.सुहास पळशीकर, भारतीय राजकाराणाची प्रकीया, य.श.मु.विद्यापीठ
२३.डॉ.शांताराम भोगले, लोकप्रशासना सिंध्दात व कार्यपध्दती, कैलास पब्लीकेशन गोकुळवाडी औरंगपूर,औरंगाबाद
२४. संतोष दस्ताने, भारत एक पाहणी, दस्ताने रामचंद्र अीण कंपनी.
२५. डॉ.टी.एन गायकवड, महाराष्ट्रातील स्थानीक स्वशासन, स्वप्नाली प्रकाशन,अहमदापूर
२६.बाय.के.सागर, महाराष्ट्रतील जिल्हे, अनिरूध्द प्रकाशन हाऊस
२७. डॉ. शांताराम भोगले, लोकप्रशासन सिध्दांत व कार्यपध्दती, कैलास पब्लिकेशन गोकुळवाडी औरंगपूरा, औरंगाबाद, पान नं. ७०
२८. डॉ.रविंद्र शर्मा व डॉ.ओ.पी.वर्मा:भारतीय प्रशासन के पचासवर्ा,पंचशील प्रकाशन,जयपूर
२९. रोहिणी गव्हाणकर: मराठा स्त्री शक्तीचे राजकारणी रूप, आदित्य प्रकाशन पुणे
३०.चंद्रशेखर बी. के. ॲन्ड आनंद: प्रोफाईल ॲन्ड पार्टिसिपेशन ऑफ वुमेन इन झेड पी ॲन्ड मंडल पंचायत मेंबर्स द केस ऑफ कर्नाटका, जर्नल ऑफ रूरल डेव्हलपमेंट व्हॉल्युम – १०
३१. एन.एन.ओझा, भारत की सामाजिक समस्यांए, कॉनिकल पब्लिशिंग
३२.डॉ.सुहास पळसीकर,भारतीय राजकारणाची प्रक्रिया, य.श.मु. विद्यापीठ, पान नं. ४४,४५
३३. Antony, M. J, Womens Rights, Dialogue Publications, New Delhi,1985
३४. Kumar, Hajira and Varghese, Jaimon, Regoncy Publishers, New Delhi,2005.
३५.Quoted in C.R. Jain women parliamentarians in India, Surjit publication, Bombay 1991, P-2